महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २९१ वे दिनांक : १७/१०/२०२६ वार : शनिवार

## दिवाळीनंतरही आणखी मदत मिळणार: पंकजा मुंडे



**जालना** : राज्य सरकारने दुष्काळग्रस्तांसाठी जाहीर केलेली सध्याची मदत ही केवळ दिवाळीपुरती भेट असल्याचे महत्त्वपूर्ण वक्तव्य जालन्याच्या पालकमंत्री आणि दुष्काळ निवारण समितीच्या सदस्य पंकजा मुंडे यांनी केले आहे. शेतकऱ्यांना दिलेली मदत तुटपुंजी आहे, या विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केले की, पिकांच्या नुकसानीपोटी मिळणारी थेट मदत, पीक विमा आणि केंद्राकडे दुष्काळ निवारणाचा अहवाल गेल्यानंतर मिळणारा निधी या सर्व वेगवेगळ्या बाबी आहेत. त्यामुळे आगामी काळात शेतकऱ्यांना आणखी दिलासा मिळेल, असे त्यांनी सूचित केले. सध्या जालना जिल्ह्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती असून वाढते तापमान, आटलेले जलस्रोत आणि उन्हामुळे करपलेली पिके यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. या गंभीर पार्श्वभूमीवर, जालना जिल्हाधिकारी कार्यालयात चारा छावण्या आणि इतर उपाययोजनांसंदर्भात एक महत्त्वपूर्ण दुष्काळ आढावा बैठक पार पडली. या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना पंकजा मुंडे यांनी दुष्काळ निवारणाबाबत सरकारची भूमिका आणि पुढील दिशा स्पष्ट केली. पंकजा मुंडे म्हणाल्या, सध्या चारा डेपो सुरू करण्याला प्राधान्य असून, गरज पडल्यास चारा छावण्या सुरू केल्या जातील. छावण्यांमध्ये सीसीटीव्ही आणि जनावरांचे जिओटॅगिंग केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पिकांच्या नुकसानीचे पंचनामे अंतिम टप्प्यात असून, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी समुपदेशन आणि गाव दत्तक घेण्याचे आवाहनही करण्यात येत असल्याचे पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले. पंकजा मुंडे पुढे म्हणाल्या, दुष्काळाची परिस्थिती गंभीर अति गंभीर होत चालली आहे. त्यामुळे चाऱ्याचे नियोजन आणि पिण्याच्या पाण्याचा नियोजनावर सरकार डोळ्यात तेल घालून काम करत आहे. दर मंगळवारी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होते. मुख्यमंत्री त्याचा आढावा घेतात. येत्या काही दिवसांमध्ये जमिनीमधील पाण्याचे आर्द्रता आणखी कमी होईल. त्यामुळे चाऱ्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. चारा छावण्यांची गरज भासेल तेव्हा त्याबाबत विचार केला जाईल. सुरुवातीला चारा गावोगावी पोहोचवण्यासाठी चारा डेपो, नंतर गाव पातळीवर छावणी आणि गरज भासली तर चारा छावण्यांचा विचार केला जाईल, असे मुंडे म्हणाल्या. केंद्रीय पथकाने नुकसानाची पाहणी केली असून पंचनामे पूर्ण होत आले आहेत. यानंतर यासंदर्भातील अहवाल लवकरच केंद्राकडे पाठवला जाईल. केंद्र सरकारच्या पथकांनी स्वतःच्या डोळ्यांनी धरण कोरडे झालेले आणि पीक पूर्ण उद्ध्वस्त झालेले पाहिले आहे.

## सतीश वाघोलेंकडे MPSC अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार



**मुंबई** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या अन्न व औषध प्रशासनाच्या औषध निरीक्षक पदाचा पेपर फुटल्याचे उघडकीस आल्यानंतर आयोगातील काही अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली. या गैरप्रकारामुळे संतप्त झालेल्या स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांनी पुण्यात सलग 10 दिवस तीव्र आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी लावून धरली होती. त्यानुसार आता अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार हा सतीश वाघोले यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणाची दखल घेत राज्य सरकारच्या वतीने मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी पुण्यात जाऊन विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली. राज्य सरकारने या गैरप्रकाराच्या चौकशीसाठी एक समिती स्थापन करण्याचे आश्वासन विद्यार्थ्यांना दिले. तसेच, वाढता विरोध पाहता आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी स्वतःहून रजेवर जाण्याचा निर्णय घेतला. सरकारच्या आश्वासनानंतर आणि भीमनवार रजेवर गेल्याने विद्यार्थ्यांनी अखेर आपले आंदोलन मागे घेतले. विवेक भीमनवार रजेवर गेल्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी आयोगाचे सदस्य सतीश बबन वाघोले यांच्याकडे अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. राज्याचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या आदेशानुसार या नियुक्तीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. सतीश वाघोले हे नुकतेच सप्टेंबर 2026 मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगात सदस्य म्हणून दाखल झाले होते. विशेष म्हणजे, 7 सप्टेंबर रोजी स्वतः विवेक भीमनवार यांनीच वाघोले यांना सदस्यपदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली होती. मात्र, केवळ एका महिन्याच्या कालावधीत निर्माण झालेल्या या अनपेक्षित परिस्थितीमुळे सतीश वाघोले यांच्यावर आता अध्यक्षपदाची मोठी जबाबदारी आली आहे. **चौकशी समितीची स्थापना**राज्य सरकारने विद्यार्थ्यांना दिलेल्या शब्दानुसार पेपरफुटी आणि आयोगातील गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची अधिसूचना जारी केली आहे. निवृत्त न्यायमूर्ती दिलीप भोसले हे या चौकशी आयोगाचे अध्यक्ष असतील. या पाच सदस्यीय समितीत निवृत्त न्यायमूर्ती पी. डी. नाईक यांच्यासह तुकाराम मुंढे, गणेश पाटील आणि लखामी गौतम या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

## तनुश्री दत्ताच्या आरोपांवर मल्हार पाटेकरांचे प्रत्युत्तर; म्हणाले, ‘प्रकरण संपले, देव त्यांचे भले करो’

**मुंबई** : दिवंगत अभिनेते नाना पाटेकर यांचा मुलगा मल्हार पाटेकर यांनी अभिनेत्री तनुश्री दत्ताच्या आरोपांवर प्रतिक्रिया दिली आहे. हिंदुस्तान टाइम्सशी बोलताना मल्हार यांनी कोणाचेही नाव न घेता म्हटले की, ज्या प्रकरणाला विनाकारण पुन्हा उकरून काढले जात आहे, ते न्यायालयात जाण्यापूर्वीच संपले आहे. सत्य नेहमी सत्यच राहील आणि अशा लोकांचे देव भले करो. ८ ऑक्टोबर रोजी गोव्यात वयाच्या ७५व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने नाना पाटेकर यांचे निधन झाले होते. त्यानंतर तनुश्री दत्ताने त्यांच्या निधनावर प्रश्न उपस्थित केले होते. संभाषणात मल्हार पाटेकर यांनी सांगितले की, काही लोक ज्या वादाला पुन्हा उकरून काढत आहेत, त्यावरील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मल्हार म्हणाले, "कोणाचेही नाव न घेता मला सांगायचे आहे की, ज्या प्रकरणाला लोक विनाकारण समोर आणत आहेत, ते संपले आहे. न्यायपालिकेकडून सर्व काही स्पष्ट झाले आहे. तरीही लोक बोलत आहेत. अशा लोकांबद्दल मी काहीही बोलणार नाही. जे सत्य आहे, तेच कायम राहील. देव त्यांचे भले करो.“ नाना पाटेकर यांच्या निधनानंतर तनुश्री दत्ताने त्यांच्या रात्री उशिरा झालेल्या अंत्यसंस्कारांवर प्रश्न उपस्थित केले होते. इंस्टाग्राम लाइव्हदरम्यान तनुश्रीने दावा केला होता की, बॉलिवूड किंवा माध्यमांमधील कोणत्याही व्यक्तीने नाना पाटेकर यांचे पार्थिव शरीर पाहिले नाही. रात्री उशिरा ११:२८ वाजता अंत्यसंस्कार करण्याच्या घाईवरही तिने आक्षेप घेतला आहे. कायदेशीर प्रकरणांपासून बचाव करण्यासाठी हा बनाव रचला गेला असावा, असा आरोप तनुश्रीने केला आहे. तनुश्रीने प्रश्न उपस्थित केला की, रात्रीच्या एवढ्या अंधारात अंत्यसंस्कार करण्याची इतकी घाई का होती आणि त्यांच्या कुटुंबीयांनीही त्यांचा चेहरा नीट पाहिला होता का? तनुश्रीने इन्स्टाग्राम लाइव्हमध्ये रुग्णालयाशी संबंधित प्रक्रियांवरही प्रश्न उपस्थित केले. तिने सांगितले की, जेव्हा त्यांचा अपघात झाला होता, तेव्हाही फोटो आणि व्हिडिओ समोर आले होते. मात्र, नाना पाटेकर यांना रुग्णालयात नेणे, तिथे मृत घोषित करणे आणि शवविच्छेदन केले जाणे यांचा एकही व्हिडिओ किंवा फोटो समोर आला नाही.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ ऑक्टोबर २०२६


## स्वखर्चातून रस्त्यावरील खड्डे बुजविले; पंचायत समिती सदस्य रंजना सांगळे यांचा पुढाकार



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतुर तालुक्यातील भोगाव देवी येथील जगदंबा मातेच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना इटोली ते भोगाव देवी मार्गावरील खड्ड्यांमुळे त्रास सहन करावा लागत होता. भाविकांची ही गैरसोय लक्षात घेऊन पंचायत समिती सदस्य रंजना बालाजी सांगळे यांनी स्वखर्चातून रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले आहे.इटोली पंचक्रोशीतील नागरिकांना भोगाव जगदंबा मातेच्या दर्शनासाठी ये-जा करताना होणारा त्रास दूर व्हावा, या उद्देशाने रंजना सांगळे यांनी पुढाकार घेतला. लोकप्रतिनिधी म्हणून जनतेच्या अडचणी समजून घेत त्या सोडविण्यासाठी त्यांनी केलेल्या या प्रयत्नाचे इटोली परिसरातून कौतुक होत आहे.पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांच्या कार्यकर्त्या असलेल्या पंचायत समिती सदस्य रंजना बालाजी सांगळे यांनी स्वखर्चातून केलेल्या या कामामुळे भाविकांना दिलासा मिळणार आहे. जनतेच्या अडचणींच्या वेळी प्रत्यक्ष मदतीसाठी पुढे येण्याच्या त्यांच्या भूमिकेचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे.

## जिंतूर नगर परिषदेत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर नगर परिषदेमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि 'मिसाईल मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती दिनांक 15/10/2026 रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले. डॉ. कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचे स्मरण करत त्यांच्या विचारांचा आदर्श समाजातील प्रत्येक घटकाने घ्यावा, असे आवाहन या कार्यक्रमाच्या निमित्ताने करण्यात आले.या कार्यक्रमाला जिंतूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष प्रताप विनायकरावजी देशमुख, उपनगराध्यक्ष मोहसिन पठाण, नगरसेवक मुन्ना कुरेशी, सय्यद जाबेर मुल्ला , योगेश काशीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच नगर परिषद कार्यालयाचे अधीक्षक अनिल समिंद्रे, बालाजी माळसापुरेकर, तुकाराम जोशी, एजाज फारुकी, गुलाब साबळे आणि स्वच्छता निरीक्षक श्रीकांत सावंत यांच्यासह नगर परिषदेचे कर्मचारी उपस्थित होते.

## विवाहितेचा छळ करून जीवे मारण्याची धमकी; पतीसह सासरच्या सहा जणांविरुद्ध तक्रार

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** विवाहितेचा शारीरिक छळ, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर प्रकार जालना येथील अहमदपुरा मंठा परिसरात उघडकीस आला आहे. पतीसह सासरच्या मंडळींकडून मारहाण होत असल्याचा आरोप करीत २२ वर्षीय विवाहितेने जिंतूर पोलीस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणामुळे विवाहित महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.पोलिसांत १४ आक्टोबर रोजी दाखल फिर्यादीनुसार, जिंतूर येथील जवाहर कॉलनी परिसरातील रहिवासी महिलेचा विवाह २०२२ मध्ये जालना येथील शेख सोहेल याच्याशी झाला होता. या दाम्पत्याला दोन मुले आहेत. लग्नानंतर पतीकडून वारंवार मारहाण होत असल्याचे महिलेने म्हटले आहे.१२ ऑक्टोबरच्या रात्री पती, सासू व नणंद यांनी मिळून मारहाण केल्याचा आरोप महिलेने केला. याबाबत तिने आई-वडिलांना माहिती दिल्यानंतर ते १३ ऑक्टोबर रोजी जालना येथे आले. त्यावेळी पतीने शिवीगाळ करीत कमरेच्या पट्ट्याने व इतर वस्तूंनी मारहाण केल्याचे, तर सासू व नणंद यांनीही मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. सासऱ्यानेही आई-वडिलांना मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच संपूर्ण कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी दिल्याचे महिलेने म्हटले आहे.या प्रकरणी पती शेख सोहेल,सासु शेख शाहीन पाशा,नणंद शेख फरीन रशीद, सासरा शेख पाशा हुसेन,रा मदिना मस्जिद,अहेमदपुरा मंठा जि.जालनासह सासरच्या इतर दोन जणांविरुद्ध महिलेने तक्रार दाखल केली असून, पोलिसांकडून पुढील कार्यवाही केली जात आहे.आरोपांची सत्यता तपासानंतर स्पष्ट होणार आहे.


## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या मूलभूत सुविधांसाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), उमरगा शाखेच्या वतीने हुतात्मा वेद प्रकाश शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उमरगा येथील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांबाबत संस्थेच्या प्राचार्यांना यासंदर्भात रीतसर निवेदन देण्यात आले.या वसतिगृहात विद्यार्थ्यांना वीजव्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी, परिसराची स्वच्छता तसेच स्वच्छतागृहांच्या दुरवस्थेसारख्या विविध समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे आढळून आले आहे. विद्यार्थ्यांना राहण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने त्यांच्या दैनंदिन जीवनावर व मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.विद्यार्थी शिक्षणासाठी घरापासून दूर राहून आपले भविष्य घडवत असताना त्यांना वसतिगृहात मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागणे ही गंभीर बाबच मुळात गंभीर आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या समस्यांची तातडीने दखल घेऊन विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, उमरगा शाखेच्या वतीने करण्यात आली आहे,असे शहरप्रमुख समर्थ कुंभार यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या :१. वीजव्यवस्था : वसतिगृहातील वीजव्यवस्थेची तातडीने तपासणी करून विद्यार्थ्यांना नियमित वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा.२. स्वच्छता : संपूर्ण वसतिगृहाची तातडीने स्वच्छता करून परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नियमित व्यवस्था करण्यात यावी.३. स्वच्छतागृहांची दुरुस्ती : वसतिगृहातील स्वच्छतागृहांची दुरवस्था दूर करून आवश्यक दुरुस्ती व नियमित स्वच्छतेची व्यवस्था करण्यात यावी.४. पिण्याचे पाणी : विद्यार्थ्यांना स्वच्छ व पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात यावे.५. सुरक्षित व आरोग्यदायी वातावरण :वसतिगृहातील खोल्या व संपूर्ण परिसराची तपासणी करून विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून द्यावे.विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागणे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे प्रशासनाने या समस्यांकडे दुर्लक्ष न करता वसतिगृहाची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कार्यवाही करून विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.येत्या आठ दिवसांत विद्यार्थ्यांचे प्रश्न मार्गी लावून आवश्यक सुविधा उपलब्ध करून न दिल्यास अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, उमरगा शाखेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा अभाविप उमरगा शहर मंत्री समर्थ कुंभार यांनी दिला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ ऑक्टोबर २०२६


## गतिरोधक

जीवनातील गतिरोधक,
सतर्क राहून ओलांडावे.
गतिरोधक ओलांडतांना,
मनाचा संयम दाखवावे. १

सुख दु:खाच्या रुपात
सदा गतिरोधक येणार.
दु:खाला जिंकून घेताच,
सुख निरंतर आनंद देणार. २

मित्रा गतिरोधका शिवाय,
जगण्यात नाहीच मजा.
गतिरोधकास दुर्लक्ष करता,
अपघाताने मिळते सजा. ३

जीवनात गतिरोधक,
पदोपदी येत असतात.
गती कमी झाल्यानंतर,
दुप्पट वेग देत असतात. ४

गतिरोधकाचा लपंडाव,
जीवनभर चालत असतो.
गतिरोधकांना टाळल्यास,
अचानक धक्का बसतो. ५

गतिरोधकाच्या धक्क्याने,
सावध होऊन सावरावे.
धक्का लागताच गतीचा,
लगाम लावून आवरावे. ६



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन संपन्न ; पाच विद्यार्थ्यांना 'उत्कृष्ट वाचक' पुरस्कार प्रदान




**कन्नड (प्रतिनिधी) :** येथील शिवाजी महाविद्यालयात मराठी विभाग, ग्रंथालय विभाग आणि तिफण वाचक चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिन विविध उपक्रमांनी उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले होते. ग्रंथपाल प्रा. संतोष देशमुख यांनी प्रास्ताविक केले. मंचावर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. भिमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए. के. महाले, प्रख्यात कवयित्री डॉ. प्रतिभा अहिरे, नॅक समन्वयक डॉ. विजय मातकर, मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे आणि डॉ. रामचंद्र झाडे यांची उपस्थिती होती.डॉ. महाले यांनी कथन केला वाचनाचा अनुभव -डॉ. भिमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए. के. महाले यांचा 'उत्कृष्ट वाचक' म्हणून विशेष सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले, मी आज जे काही आहे ते वाचनामुळेच आहे. रोजचे वर्तमानपत्र आणि चरित्र, आत्मचरित्र, अनुवादित पुस्तके आदींचे वाचन मला नेहमी विद्यार्थ्यांपेक्षा एक पाऊल पुढे ठेवते. मोबाईलवर माहिती मिळते पण ज्ञान पुस्तकातच मिळते. वाचनामुळे जीवन समृद्ध होते.डॉ. प्रतिभा अहिरे यांचे मार्गदर्शन - प्रख्यात कवयित्री डॉ. प्रतिभा अहिरे म्हणाल्या, वाचन म्हणजे लेखकाच्या मनाशी संवाद साधणे आहे. कविता वाचल्याने मन संवेदनशील होते. मुलींनी आत्मचरित्रे आवर्जून वाचावीत, त्यातून संकटाशी लढण्याचे बळ मिळते. रोज झोपण्यापूर्वी दहा मिनिटे वाचन केल्यास दिवसभराचा ताण निघून जातो. आपली बोली ही आपली आई आहे, तिला लिहून ठेवा.पाच विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान - वर्षभर सातत्याने वाचन करणाऱ्या पाच विद्यार्थ्यांना 'उत्कृष्ट वाचक २०२६-२७' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कु. पूजा चव्हाण (बी.ए. द्वितीय), कु. साक्षी धनेधर (बी.ए. द्वितीय), कु. साक्षी सोळुंके (बी.फार्मसी चतुर्थ), कु. जान्हवी गाढे (बी.सी.एस. तृतीय) आणि संकेत निकम (बी.फार्मसी द्वितीय) हे पुरस्कारार्थी होते.यावेळी ग्रंथालयात दुर्मिळ ग्रंथांचे विशेष प्रदर्शन आणि विद्यार्थ्यांचे काव्यवाचन घेण्यात आले.अध्यक्षीय मनोगत -शेवटी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले, पुस्तक हे सर्वात स्वस्त आणि सर्वात प्रामाणिक मित्र आहे. ३० सेकंदाच्या रीलमध्ये मनोरंजन मिळते, पण ३० पानांच्या पुस्तकात आयुष्य घडवणारे ज्ञान मिळते. ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्मा आहे. जो विद्यार्थी ग्रंथालयाशी जोडला गेला त्याचे भवितव्य उज्वल बनते.सूत्रसंचालन उत्कृष्ट वाचक पुरस्कारार्थी कु. पूजा चव्हाण हिने केले तर आभार डॉ. रामचंद्र झाडे यांनी मानले. कार्यक्रमास सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## पुस्तकांचा सहवास माणसाला समृद्ध करतो



**कन्नड (अरुण थोरात) :** "वाचन हे केवळ माहिती मिळविण्याचे साधन नसून, ते माणसाच्या विचारांना समृद्ध करणारे आणि जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारे माध्यम आहे. पुस्तकांच्या सहवासातून माणसाला विविध अनुभव, विचार आणि ज्ञानाची ओळख होते. चांगल्या पुस्तकांचे वाचन माणसाला संवेदनशील बनवते, कल्पनाशक्तीला चालना देते आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी मदत करते. त्यामुळे प्रत्येकाने नियमित वाचनाची सवय जोपासावी "असे प्रतिपादन प्रसिद्ध कवीमा. दासू वैद्य यांनी आपल्या भाषणात केले.डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय कन्नड यांच्या वतीने प्रसिद्ध कवी प्रा. दासू वैद्य यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर वाचनालयाचे सचिव रामकृष्ण पवार, बोली भाषा अभ्यासक डॉ रमेश सूर्यवंशी, प्रा अशोक भोसीकर, प्रा. रंगनाथ लहाने यांची उपस्थिती होती.काही वेचलेले... काही वाचलेले याविषयावर आयोजित व्याख्यानात कवी दासू वैद्य यांनी मुलांना कथा, स्वानुभव यामाध्यमातून रंजकपणे वाचनाचे महत्त्व सांगितले.संजय त्रिभुवन यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्राध्यापक अशोक भोसीकर यांनी आभार मानले. यावेळी श्रीमती सोनार, अजित खंबाट यांच्या सह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## जिंतूरात काँग्रेसचे धरणे आंदोलन



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** परभणी जिल्ह्यासह जिंतूर तालुक्यात यंदा १९७२ पेक्षाही भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याचा दावा करत शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी, तसेच निवडणूक आयोगाचे अध्यक्ष ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, या मागण्यांसाठी काँग्रेसच्या वतीने बुधवारी (दि. १५) जिंतूर तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी विविध मागण्यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी केली. दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, पिकांचे उत्पादन घटल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत शासनाने शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली.या वेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले. शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी एक लाख रुपयांची मदत देण्यासह इतर मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.आंदोलनानंतर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत यांना विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर केले. त्यानंतर आंदोलनाची सांगता झाली.या आंदोलनात काँग्रेसचे नगरसेवक,पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ ऑक्टोबर २०२६


## पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालयात संशोधन पद्धतीवर एकदिवसीय कार्यशाळा




**नागपूर (चंद्रशेखर पाटील) :** डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू एस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कामठी रोड येथे एक दिवसीय कार्य शाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्य शाळेचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील यांनी भूषविले. या कार्यशाळेसाठी अतिथीवक्ता म्हणून महाविद्यालयाच्या माजी विदयार्थीनी डॉ. मेहनाज पटेल, प्राचार्य आर्चीड इंटर नॅशनल स्कूल, नागपूर डॉ. संध्या फटिंग, सहयोगी प्राध्यापक तिरपुडे समाज कार्य महाविद्यालय, नागपूर तसेच प्रमुख वक्ता म्हणून महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. लखन इंगळे यांना निमंत्रित करण्यात आले. या कार्य शाळेला इतिहास विभाग प्रमुख आणि वरिष्ठ प्राध्यापक डॉ. चंद्रशेखर पाटील, समाज शास्त्र विभाग प्रमुख डॉ. कमलाकर तागडे यांची विचार पिठावर विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी अर्थशास्त्र, राज्यशात्र, समाज शास्त्र आणि डॉ. आंबेडकर विचार धारा विभागाच्या अध्ययन मंडळाच्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. मेहनाज पटेल यांनी मानव्यशास्त्र अध्ययन मंडळाचे संयुक्त उदघाटन झाल्याचे सर्वप्रथम जाहीर केले. त्यांनी " संशोधन प्रक्रियेत निष्ठा आणि प्रामाणिकता महत्वाची असते. संशोधना चे शिर्षक हाच प्रकल्पाचा आत्मा आहे " असे महत्व पूर्ण विचार मांडले. दुसऱ्या अतिथी वक्ता डॉ. संध्या फटिंग यांनी संशोधन अहवाल, संशोधनाची उद्दिष्टे आणि गृहीतके, संशोधन पद्धती यावर सखोल मार्गदर्शन केले. "संशोधन प्रक्रियेत संशोधकाचे, निरीक्षण परीक्षण, संभाषण आणि निर्णय कौशल्य फार महत्वाची भूमिका बजावतात ."असे विचार व्यक्त केले. अतिथी वक्ता डॉ. लखन इंगळे यांनी महाविदयालयात बी. ए, एम. ए. ( पदवी आणि पदव्युत्तर ) चे प्रवेशित विद्यार्थ्यांना आणि मानव्यशास्त्र विषयांच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना PPTच्या माध्यमातून संशोधन क्षेत्र , शिर्षक निवडीची आवश्यकता, मागील संशोधनाचा मागोवा, कार्य प्रणाली, संशोधन आराखडा, नमुना निवड या विविध पैलू वर सविस्तर माहिती दिली. कार्य शाळेच्या आयोजनाची प्रास्ताविक भूमिका डॉ. गायत्री कडवे यांनी विषद केली आणि सोबतच सर्व निमंत्रित वक्त्यांचा परिचय सभागृहास करून दिला. या कार्य शाळेचे सूत्रसंचालन समाज शास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. मानसी पानपालिया यांनी केले. तर आभार प्रदर्शन राज्य शास्त्र विभागाच्या प्रा. पिंकी भेंडे यांनी केले. या कार्य शाळेत 80 पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांकरिता नाश्ता ची व्यवस्था आयोजकांच्या वतीने करण्यात आली होती. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाण पत्राचे वितरण करण्यात आले. या कार्य शाळेच्या यशस्वीतेसाठी राज्य शास्त्र विभाग प्रमुख डॉ. विमल राठोड, सहा. प्राध्यापक डॉ. सुशांत चिमणकर, डॉ. महेंद्र गायकवाड, डॉ. सना कौसर, डॉ. अमृता डोरलीकर आणि सर्व सहकारी प्राध्यापक यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी सर्व विभागातील प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रम महाविद्यालय प्रथेनुसार राष्ट्रगीताने संपन्न झाला.

## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात इकरा पब्लिक स्कूलच्या असजद अलीचे नावीन्यपूर्ण मॉडेल




**जळगाव :** भादली येथील महात्मा गांधी विद्यालयात आज,शुक्रवार, दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात इकरा पब्लिक स्कूल,मोहाडी, जळगाव येथील विद्यार्थी असजद अली जावेद अली याने आपल्या नावीन्यपूर्ण विज्ञान मॉडेलद्वारे सर्वांचे लक्ष वेधून घेतले.असजद अली याने 'उत्तम जीवनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता या मुख्य विषयांतर्गत 'टीचेबल मशीन टूलच्या साहाय्याने जैवविघटनशील व अजैवविघटनशील कचऱ्याचे वर्गीकरण' या उपविषयावर उत्कृष्ट मॉडेल तयार केले होते.कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून कचऱ्याचे वर्गीकरण कशा प्रकारे करता येते, हे असजद अली याने अत्यंत प्रभावी, सोप्या व अभ्यासपूर्ण पद्धतीने उपस्थितांसमोर सादर केले.त्याच्या सादरीकरणातून वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता, तंत्रज्ञानाची जाण आणि नावीन्यपूर्ण विचारांची सुंदर झलक पाहायला मिळाली.यावेळी गटशिक्षणाधिकारी अजित तडवी साहेब, विजय पवार साहेब, विस्तार अधिकारी अलाउद्दीन बेलदार, शेख खलील तसेच केंद्रप्रमुख हैदर सर यांनी असजद अलीच्या मॉडेलची पाहणी केली.त्याच्या विज्ञानविषयक कल्पनेचे व प्रभावी सादरीकरणाचे कौतुक करून त्याला प्रोत्साहन दिले.या नावीन्यपूर्ण मॉडेलच्या निर्मितीसाठी शाळेचे विज्ञान शिक्षक इश्तियाक अहमद यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी आणि आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासाठी शाळेच्या वतीने करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचे हे एक उल्लेखनीय उदाहरण ठरले.असजद अलीच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेच्या व्यवस्थापनाने, मुख्याध्यापकांनी व शिक्षकवृंदाने त्याचे अभिनंदन केले आणि पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## आरोग्य विद्यापीठात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी



**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रा. डॉ. व्यंकट गिते आणि कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या कार्याची माहिती दिली. याप्रसंगी, डॉ. नितीन कावेडे, श्री. महेंद्र कोठावदे, श्री. प्रकाश पाटील, ऑड. संदीप कुलकर्णी, श्री. संदीप राठोड, ब्रिग. सुबोध मुळगुंद, श्रीमती योगीता पाटील, श्रीमती शिल्पा पवार, श्री. संदीप महाजन, श्री. महेश बिरारीस, श्री. वाय.जी. पाटील, डॉ. गौरांग बक्षी, श्री. अविनाश रक्टे, श्री. सुरेश शिंदे, श्री. पुष्कर त`हाळ, श्री. कृष्णा भवर, श्री. दिलीप राजपूत आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मतदार नोंदणीसाठी २६ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ; १७ ते २५ ऑक्टोबर दरम्यान राज्यात विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन

**बीड : (भगवंत पाळवदे)** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात राबवण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी तसेच दावे व हरकती दाखल करण्यासाठी नागरिकांना आता २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या वाढीव मुदतीचा लाभ घेत जास्तीत जास्त नागरिकांना आणि विशेषतः नवमतदारांना मतदार यादीत आपले नाव सुलभतेने नोंदवता यावे, यासाठी राज्यातील सर्व मतदान केंद्रांवर १७, १८ तसेच २४ आणि २५ ऑक्टोबर २०२६ या शनिवार व रविवारच्या सुट्टीच्या दिवशी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.निवडणूक आयोगाने जारी केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत आता २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढवण्यात आली असून, या प्रक्रियेनंतर राज्याची अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. यापूर्वी सप्टेंबर महिन्यात मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात आली होती. आता नव्याने मिळालेल्या मुदतवाढीचा सर्वंकष विचार करून या नवीन तारखांना पुन्हा विशेष शिबिरे घेण्यात येत आहेत, जेणेकरून कोणत्याही पात्र नागरिकाला नोंदणीपासून वंचित राहावे लागणार नाही.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकडून सर्व संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि निवडणूक अधिकाऱ्यांना या शिबिरांचे यशस्वी आयोजन करून त्याचा नियमित अहवाल सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. प्रशासनाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या या सुविधेचा अधिकाधिक लाभ घ्यावा आणि ज्या पात्र नागरिकांनी व नवमतदारांनी अद्याप मतदार यादीत नाव नोंदवलेले नाही, त्यांनी आपल्या नजीकच्या मतदान केंद्रावर जाऊन या विशेष शिबिरांच्या माध्यमातून आपली नोंदणी आवर्जून पूर्ण करावी, असे आवाहन निवडणूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ ऑक्टोबर २०२६


## बीड जिल्ह्यात सामूहिक विवाह सोहळ्यांची विशेष मोहीम; नवदाम्पत्यांना मिळणार २५ हजार रुपयांचे अनुदान

**बीड (भगवंत पाळवदे) :** दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुला-मुलींच्या लग्नासाठी होणारा मोठा खर्च टाळता यावा आणि सामूहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन मिळावे, या हेतूने बीड जिल्ह्यात तालुकास्तरावर सामूहिक विवाह सोहळे आयोजित करण्यासाठी प्रशासनातर्फे विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त यांनी घेतलेल्या आढावा बैठकीतील सूचनेनुसार बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या मोहिमेची अंमलबजावणी करण्यासाठी विस्तृत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. या मोहिमेअंतर्गत सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी होऊन विवाह करणाऱ्या दांपत्यांना राज्य शासनाकडून प्रतिदाम्पत्य पंचवीस हजार रुपये इतके अनुदान दिले जाणार आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग आणि महिला व बालविकास विभाग या तीन विभागांच्या माध्यमातून कन्यादान योजना आणि शुभमंगल सामूहिक विवाह योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या माध्यमातून अनुसूचित जाती, नवबौद्ध घटक, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग तसेच शेतकरी व शेतमजूर कुटुंबातील वधूंना आर्थिक लाभ दिला जाणार आहे. त्याचबरोबर सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या संस्थांना प्रतिदांपत्य चार हजार रुपये आणि काही योजनांमध्ये अडीच हजार रुपये इतके अनुदान शासनातर्फे देण्यात येणार आहे.या विशेष मोहिमेच्या यशस्वी आयोजनासाठी आणि प्रशासकीय समन्वयासाठी जिल्हा तसेच तालुकास्तरावर विशेष समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. तालुकास्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीमध्ये गटविकास अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून कामकाज पाहतील. तर जिल्हास्तरावर अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वय समिती गठित करण्यात आली असून, यामध्ये सहायक आयुक्त (समाजकल्याण) हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. गावपातळीवर या योजनांचा सर्वदूर प्रचार व प्रसार व्हावा यासाठी अंगणवाडी सेविकांमार्फत कार्यवाही केली जाणार असून, अर्ज जमा करण्यासाठी अंगणवाडी सेविकांची 'संपर्क अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या वधू-वरांचे अर्ज अंगणवाडी सेविकांमार्फत संकलित करून बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडे दाखल केले जातील. तालुकास्तरीय समितीने प्राथमिक छाननी करून परिपूर्ण असलेले अर्ज मंजुरीसाठी संबंधित जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडे पाठवणे अनिवार्य करण्यात आले आहे. जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेल्या तारखांना सामूहिक विवाह सोहळे पार पडल्यानंतर, विवाह नोंदणी अधिकाऱ्यांकडे रीतसर नोंदणी करून विवाह प्रमाणपत्र मिळवणे आवश्यक राहील. विवाह नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केली जाईल, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रक्रियेच्या संनियंत्रणासाठी जिल्हा स्तरावर समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

## सातवाहन कालखंड ते मराठा काळाचे अनोखे दर्शन



**छत्रपती संभाजीनगर :** इतिहास, लिबरल आर्ट्स, पुरातत्त्वशास्त्र, मोडी व वस्तुसंग्रहालय या विषयाच्या विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वास्तूंचे महत्त्व आणि सांस्कृतिक वारशाच्या जतनाविषयी प्रत्यक्ष ज्ञान मिळावे, या उद्देशाने श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय, छत्रपती संभाजीनगर येथे विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रिय भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या वस्तू संग्रहालयात सातवाहन कालखंड ते मराठा कालखंडाचे अनोखे दर्शन विद्यार्थ्यांनी घेतले.श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु या संग्रहालयात एकूण पाच दालन आहेत व पाचही दालन वेगवेगळ्या नावांनी नाव देण्यात आलेले आहे. एक नंबरचे दालन शिवरायांचे युद्धनीती या दलनामध्ये शिवकालीन हत्यारे ठेवण्यात आलेले आहेत.दालन क्र. दोन मध्ये मराठाकालीन जनजीवन आहे. पूजेचे भांडी, मोजणी पात्र, घरगुती वापरायचे भांडे, देवी देवतांचे मूर्ती तसेच फोटो, लोखंडी दिवे, मंदिरातले दिवे या दालनामध्ये ठेवण्यात आलेले आहेत. त्याच बरोबर कुराण ही चारशे वर्षे जुनी आहे.दालन क्र. तीन नाण्यातून महाराष्ट्र या मध्ये दोन हजार वर्षापासून ते इंग्रज ब्रिटिश काळापर्यंत सर्व नाणी यामध्ये ठेवण्यात आलेली आहेत. सातवाहन कालीन, सुलतान कालीन, मुघल नाणी, छत्रपती शिवाजी महाराजांचे नाणी,पाशांची नाणी, मराठे सरदारांची नाणी,स्वतंत्र राज्यकर्त्यांची नाणी व ब्रिटिशांनी भौतिक त्यांची नाणी तसेच या दालनामध्ये शिवाजी महाराजांची जन्म कुंडली, खजिना पेटी व दरवाजांचे कुलुप हे ठेवण्यात आलेले आहेत.दालन क्र. चार मध्ये मराठ्यांचा उदय या मध्ये अडकित्यांची विविध प्रकार तसेच सुरमाधानी सोन्याची पेटी व वजरी अंग घासण्याची ही ठेवण्यात आलेली आहे तसेच ज्ञानेश्वरी श्री गुरुचरित्र व एकनाथांची भागवत चतुर्शुकील भागवत हस्तलिखित तसेच साधुसंत लोकजी वापरते हुबळी दासबगेची मूर्ती ही येथे आहे. राणी महालातील वस्तू जसे की, पानदान सुरळी का आरसा,पांडवा डब्बा,श्री विष्णूची सोन्याची पेंटिंग इथे ठेवण्यात आलेली आहे.शेवटचा दालन सातवाहन काला दालन असुन यामध्ये सातवाहन कालीन वस्तू ठेवण्यात आलेल्या आहे.वेगवेगळी मृदुभांड, खेळणी गौरीची मूर्ती ठेवण्यात आलेले आहेश्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाचे अभिरक्षक, संचालक श्रीप्रकाश पुरवार व स्वप्निल मगरे यांनी वस्तुसंग्रहालयातील माहिती विद्यार्थ्यांना दिली ही क्षेत्रीय शैक्षणिक भेट विभागप्रमुख प्रा. डॉ. गीतांजली बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात होते.यावेळी स्वप्निल मगरे यांचा सत्कार पुस्तक देऊन करण्यात आला. डॉ. संजय पाईकराव यांनी विभागातर्फे उपस्थित असलेल्या सर्व अधिकाऱ्यांचे आभार मानले. या क्षेत्र भेटीसाठी प्रा. डॉ. बिना सेंगर, डॉ. महेश सरोदे, डॉ.संजय पाईकराव, डॉ. रवी गव्हादे,प्रा. अश्विनकुमार जोगदंड, प्रा. प्रियदर्शन हटकर, प्रा. अक्षय मिरासदार, प्रा. नम्रता भोसले, प्रा. गुणज्ञ मगरे, श्री. दिनेश सूर्यवंशी यांनी सहकार्य लाभले. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## वाचनातूनच घडते ज्ञानसमृद्ध समाजनिर्मिती; बारवाले महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात



**जालना :** भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित पुस्तक परीक्षण स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती, चिकित्सक विचार आणि साहित्याविषयी आवड निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी आयोजित पुस्तक परीक्षण स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत ऐश्वर्या सुंदरराव चव्हाण हिने प्रथम क्रमांक, शुभांगी सुंदरराव चव्हाण हिने द्वितीय क्रमांक, तर आरती सुरेश सुवालका हिने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेचे परीक्षण प्रा. राजक्रांती वलसे आणि प्रा. व्यंकटेश कोरेबाईंवाड यांनी केले.वाचन, जिज्ञासा आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या बळावर डॉ. कलाम यांनी भारताला अवकाश विज्ञान आणि अणुविज्ञान क्षेत्रांत स्वयंपूर्ण बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. देशाच्या संरक्षण सामर्थ्याच्या बळकटीकरणातही त्यांची भूमिका मोलाची होती. 'मिसाईल मॅन' म्हणून जगभर ओळखले जाणारे डॉ. कलाम हे साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचे प्रतीक होते, असे त्याने सांगितले.विद्यार्थ्यांमध्ये सहज मिसळणारे, तरुणांच्या स्वप्नांना बळ देणारे आणि आपल्या कार्यातून प्रेरणा देणारे डॉ. कलाम यांचे जीवन प्रत्येकासाठी आदर्श आहे. शुद्ध चारित्र्य, प्रामाणिक प्रयत्न आणि ज्ञानाची अखंड साधना यांच्या माध्यमातून देशासाठी मोठे योगदान देता येते, हा संदेश त्यांच्या जीवनातून मिळतो. त्यामुळे डॉ. कलाम यांचे विचार आणि कार्य भावी पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहतील, असे मत क्षितिज दिवे या विद्यार्थ्याने व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कल्याण कुंभार यांनी केले. यावेळी डॉ. प्रियदर्शन भवरे, प्रा. सुरेश कागणे, प्रा. शशिकांत चौधरी, प्रा. निशिकांत लोखंडे, प्रा. बळीराम कटारे, प्रा. रवींद्र शिंपी, प्रा. कालिदास सूर्यवंशी, प्रा. राजक्रांती वलसे, प्रा. संभाजी कांबळे, प्रा. सुनीता भराडे, प्रा. स्वाती पुरी, प्रा. क्षमा अनभुले, प्रा. सायरा काझी, प्रा. दीप्ती जैन, प्रा. शिंदे, प्रा. सिरसाठ, प्रा. कमठम, श्री विजय लोणकर, श्री राम हिवरेकर, श्री जनार्दन कळम, श्री. शिराळे, श्री अजय जोशी, श्री शिवाजी जोशी, श्री विनोद पवार, श्री सुरेश खरात, श्री रोहन वर्तले आणि श्रीमती ज्योती धांडे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.डॉ. अब्दुल कलाम यांच्या विचारांना अभिवादन करत वाचनाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय जिंतूर येथे वाचन प्रेरणा दीन साजरा




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** डॉ ,ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती दिनांक १५/१०/२०२६ रोजी वाचन प्रेरणा दीन म्हणून साजरी करण्यात आली या वेळी वाचनालयात समूह वाचन तसेच पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले,या वेळी बाल वाचक तसेच परिसरातील वाचन प्रेमी नागरिकांनी आपली उपस्थिती लावली या वेळी मुलांना वाचन संस्कार मिळावे या साठी ग्रंथालय ओळख तसेच इतर वाचन साहित्याची माहिती ग्रंथपाल सुशील कुबडे यांनी दिली तसेच या वेळी सुरेश सानप,निशांत भडगळ नितीन गुहाडे प्रसाद काळे हे उपस्थित होते

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ ऑक्टोबर २०२६


# नवरात्र नवदुर्गा आणि स्त्री जन्माच्या नऊ अवस्था....

शारदेय नवरात्र उत्सव म्हणजे जणू आनंद, श्रद्धा भक्ती व उल्हासाचा कालावधी होय. नवरात्र नवदुर्गा उत्सवा अंतर्गत जिकडे तिकडे पूर्ण भारतभरच नाही तर जगभर उल्हास आणि उत्साहाने हा उत्सव साजरा केला जातो विविध राज्यात आपापल्या वैविध्यपूर्ण रितीरिवाजांनी घराच्या स्वच्छते पासून आरोग्यापासून पंचमहाभूतांच्या, अखंड विश्वाच्या मांगल्ये स्वरूपाचे चिंतन प्रत्येक घरातील स्त्री करते. किती जरी विज्ञानाच्या गाथा आपण गात असलो तरी कुठेतरी Dark Hole,Big bang theory,Milky way galexy ह्यामानवी जीवनाची रहस्य कायम ठेवतात. सर्वसामान्यपणे सजीव बाल,युवा व वृद्ध या तीन अवस्था तून आपलं जीवन चक्र मार्गक्रमित करत असतो. त्यातही सृजनत्वाचे स्वरूप आदिमाया म्हणजेच स्त्री ही नऊ अवस्थातून आपले जीवन व्यतीत करते आणि ते प्रत्येक स्त्रीच्या जीवनाच्या नऊ अवस्था म्हणजेच नवदुर्गा स्वरूप होय हे आपण मान्य करायला हव्यात. त्या खालील प्रमाणे शैलपुत्री - शैलपुत्री म्हणजे हिमालयाची कन्या म्हणजेच स्त्रीची बालिका अवस्था. अजान, अल्लड आई वडिलांच्या अंगा खांद्यावर खेळणार बालिका स्वरूप म्हणजेच शैलपुत्री होय. आई-बाबा कडून प्राप्त नव ऊर्जेला आई-वडील वळण देण्याचे कार्य करत असतात ती बालिका अवस्था म्हणजे खऱ्या अर्थानं शैलपुत्री होय ब्रह्मचारिणी -ब्रह्मचरणी म्हणजे जप, तप साधना करणारी माता पार्वतीची अवस्था म्हणजेच आजची शाळेत जाणारी विद्यार्थिनी अवस्था अभ्यासातून एकाग्रतेने ज्ञान,कौशल्य विनम्रप्रेपणे अवगत करणारी ब्रह्मचर्य पालन करणारी, कुमारीका अवस्था म्हणजेच ब्रह्मचारणी होय. चंद्रघंटा - चंद्रासारखं शितल व मोहक स्वरूप असणारी देवी म्हणजे चंद्र घंटा होय स्त्री जीवनातील मोहक,सुंदर, सुशील, सुशिक्षित, उपवर चरित्र संपन्न युवतीचि अवस्था होय. आई-वडिलांच्या स्वाभिमानाचा प्रतीक सन्मानाचं प्रसन्नतेच स्वरूप म्हणजेच चंद्रघंटा स्वरूप होय. कुष्मांडा- कुष्मांडा म्हणजे प्रचंड ऊर्जेचा स्त्रोत असणारी नवब्रम्हांडाला उत्पन्न करणारी देवी म्हणजेच स्त्रीची गरोदर मातेची अवस्था होय.जिने आपल्या उदरात नव उर्जा निर्मिती, पालन,पोषण करणारी स्त्रीची गर्भधारण केलेली अवस्था म्हणजेच कुष्मांडा अवस्था होय. स्कंदमाता- स्कदमाता म्हणजे नवरात्रीतील पाचव नवदुर्गा स्वरूप होय. स्कंदमाता म्हणजे आपल्या कार्तिकेला ओटी पोटाशी धरून दूध पाजणारी,जीवनदान देणारी देवीचे स्वरूप होय . म्हणजेच प्रत्यक्षात स्कंदमाता म्हणजे करुणा, दया, माया, ममता, ममतेचे स्वरूप. आपल्या बाळाला ओटी पोटाशी धरून दूध पाजून तृष्णा शमवणारी नवउर्जेचे पालन पोषण करणारी वळण लावणारी मातृ स्वरूप स्कंदमाता होय. कात्यायनी- कात्यायनी ऋषी कात्यनाची कन्या म्हणजेच कर्तव्य, कर्तृत्व, कर्मठ गतिशील पणे आपल्या परिवारासाठी तीळ तीळ जमा करणारी उपक्रमशील गृहिणी परिवाराची काळजी घेणारी स्त्री अवस्था म्हणजेच कात्यांयनी अवस्था होय. जी आपल्या संसारात हवे असणाऱ्या नको असणाऱ्या ऊर्जांना प्रति जागरूक असणारी काळजी घेणारी सजग गृहिणींची अवस्था म्हणजेच कात्यायनी होय. आपल्या संसाराचं जाळ निग्रहाने तटस्थपणे गतिशीलतेने विणणारी स्त्री अवस्था म्हणजेच कात्यायनी होय. काल रात्री - नवरात्रीतील आठव्या दिवशी आठव्या रात्री जिचे पूजन केले जाते अशी असुरांचा रौद्र स्वरूपा ने प्रचंड, संपूर्ण उर्जेने विनाश करणारी व आपल्या परिवाराचे वाईट गोष्टींपासून रक्षण करणारीदेवी म्हणजे काल रात्री होय जी आपल्या परिवाराचे आपल्या समाजाचे वाईट चालीरीतींपासून वाईट दुष्ट ऊर्जांपासून रक्षण करणारी सदैव सजग राहून प्रचंड व संपूर्ण ऊर्जेने सुशील पणे संकटांवर मात करणारे स्त्री यांचे स्वरूप म्हणजेच काल रात्री होय. आज खूप मोठ्या प्रमाणामध्ये अनेक स्त्रिया या काल रात्री चे रूप धारण करून आपल्या परिवाराला समाजातील भ्रष्ट व्यवहारापासून दूर ठेवणारे साम,दाम,दंड,भेद यांचा उपयोग करून आपल्या कुटुंबाचे रक्षण करणारी स्त्री जन्माची अवस्था तसेच मुलांना वळण लावणारी संस्कार शिकवणारी, दृढपणे संसाराची धुरा सांभाळणारी अवस्था म्हणजेच काल रात्री माता होय. महागौरी -महागौरी हे देवीचे,निर्मळ, सोज्वळ,, शांत स्वरूप होय तर स्त्री जीवनातील संकटांवर मात करून अंततः सौजन्यशील, शांत, सोज्वळ निर्मळ प्रेमळ,कर्तृत्ववान,आपल्या मुलाबाळांच्या कर्तृत्वाला पाठबळ देणारी एक सजग माता, सौजन्यशील स्त्रीची अवस्था म्हणजेच महागौरी ची अवस्था होय जीवनातील विविध अनुभवातून ध्येयपूर्ती करून शांततेकडे संयमाने प्रस्थान करणारी मानवी स्त्रीची अवस्था म्हणजेच महागौरी होय. सिद्धधात्री -सिद्धधात्री नवदुर्गातील नवमीच्या दिवशी पूजन केली जाणारी देवी म्हणजेच सिद्धधात्री होय.आपल्या आयुष्यातील गोड कडू अनुभवांतून प्रगल्भ तेणे स्थिरतेने अचूक,भविष्याचा वेध घेण्याची सिद्धता प्राप्त स्त्रीची अवस्था म्हणजेच सिद्धी धात्री होय जी आपल्या आत्मसाक्षात्काराने पुढील पिढीला चिरत्व, स्थिरत्व, शुभ आशीर्वादांचा, सर्व मांगल्याचा खजिना प्रदान करत स्वतः मुक्तीच्या मार्ग समाधानाने पादक्रांत करणारी स्त्रीची अवस्था म्हणजेच सिद्धधात्री होय. प्रत्येक स्त्रीला या नऊ ही अवस्थेतून अतिशय सजगतेने सौजन्य आणि सहनशीलतेने,संयमाने जावे लागते त्यातूनच तिचं आयुष्य विविध रंगांनी रंगवलं जातं तर विविध गुणांनी गायलं जातं. व तसेच ती सक्षम नव पिढी निर्माण करू शकते. सुशिक्षित व सजग पालक म्हणून आपण आपल्या घरातील प्रत्येक स्त्रीच्या या नऊ अवस्थांचा आदर करायला हवा. आज समाजातील अनेक विकृत वृत्ती या अवस्थांना छिन्न विच्छीन्न करून स्त्री तत्व विनाशाकडे मानवी जीवन जात आहे. स्त्रीभ्रूणहत्य, बालविवाह,, दासी प्रथा, स्त्रियांना उच्च शिक्षणापासून वंचित ठेवणे, लहान वयातच लहान पोरींना पळवून नेऊन वाईट व्यवसायाला लावणे, स स्वेराचारी, समलैंगिकता, स्वावलंबनाच्या नावाने लग्न न करणे, मातृत्व विरोध, तसेच प्रेमाच्या नावाखाली तिचा बळी घेणे अशा एक ना अनेक विकृत परंपरांनी समाज अजूनच भ्रष्ट होत चाललेला आहे. या नवरात्रीत आपण या सर्व स्त्रियांच्या नऊ अवस्थांचे रक्षण करण्याचा संकल्प करायला हवा तरच खऱ्या अर्थाने हाच नवचंडीका यज्ञ ठरेल. मानवी जीवन योग्यरित्या अखंड,अविनाशी पणे यशस्वी होईल. सर्वांना नवदुर्गा नवरात्र महोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा...

**लेखिका -धनश्री चिताडे मुसने, चंद्रपूर.**

# सेवासंकल्प अभियान २०२६ अंतर्गत नेत्र तपासणी आरोग्य शिबिर संपन्न



**कन्नड :** सेवासंकल्प अभियान २०२६ अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, औराळा येथे नेत्र तपासणी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरामध्ये एकूण ८० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी ९ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी चिकलठाणा मिनी घाटी रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे पाठविण्यात येणार आहे.शिबिरादरम्यान रुग्णांची नेत्र तपासणी करण्यासोबतच रक्त तपासणी, रक्तातील साखरेची तपासणी, रक्तदाब तपासणी तसेच ईसीजी (ECG) तपासणी करण्यात आली.या शिबिरासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतीक्षा राजपूत मॅडम, नेत्रतज्ज्ञ श्री. किसान चव्हाण सर (Optometrist), आरोग्य सहाय्यक श्री. चौधरी साहेब, नानवरे सिस्टर, पिंपळे सिस्टर, रहाणे साहेब तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# दौलताबाद येथून ४५ वर्षीय व्यक्ती बेपत्ता; अपहरणाचा संशय, पोलिसांत तक्रार दाखल



**दौलताबाद (जावेद अहमद) :** दौलताबाद कुंभारवाडा येथून एक ४५ वर्षीय व्यक्ती संशयास्पद रित्या बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कामावर जातो असे सांगून घरातून पडलेल्या या व्यक्तीचे अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी अपहरण केले असावे, असा संशय त्यांच्या पत्नीने व्यक्त केला असून या प्रकरणी दौलताबाद पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार (जबाब) नोंदवण्यात आली आहे.पोलिसांत दिलेल्या जबाबानुसार, शाम गोविंद जाधव (वय ४५, रा. कुंभारवाडा, दौलताबाद) हे मंगळवार, दि १३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजेच्या सुमारास कामावर जातो असे सांगून घरातून निघाले होते. त्यानंतर सायंकाळी ५:३० वाजेच्या सुमारास त्यांच्या पत्नी शितल जाधव यांनी त्यांना फोन केला असता, शाम जाधव यांनी आपण 'एएस क्लब' येथे असल्याचे सांगितले. तसेच फोनची चार्जिंग संपत आली असून मोबाईल स्विच ऑफ होत असल्याचेही त्यांनी पत्नीला सांगितले.त्यानंतर रात्री उशिरापर्यंत शाम जाधव घरी न परतल्याने नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला, मात्र त्यांचा कुठेही पत्ता लागला नाही. अखेर या प्रकरणी शितल जाधव यांनी पोलिसांत धाव घेत तक्रार नोंदवली आहे.बेपत्ता व्यक्तीचे वर्णन व तपशीलउंची: अंदाजे ६ फूट ७ इंच,रंग/शारीरिक वैशिष्ट्ये: गव्हाळ वर्ण, सरळ नाक, काळे केस, डोळ्यांवर काळा चष्मा आणि उजव्या हातावर मराठीत 'शाम' असे नाव गोंदलेले (टॅटू) आहे.अंगात काळ्या-पांढऱ्या रंगाचा शर्ट, निळी जीन्स आणि पायात चॉकलेट रंगाची चप्पल.* वाहन: राखाडी (ग्रे) रंगाची ॲक्टिव्हा मोपेड स्कूटी (क्रमांक: MH 20 HV 3305).या घटनेबाबत दौलताबाद पोलिसांनी गुन्हा नोंदवून घेतला असून पुढील कायदेशीर कारवाई व शाम जाधव यांचा शोध कसून सुरू केला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ ऑक्टोबर २०२६


# अरण्यदीक्षा - रान पाखरांच्या संचिताची अस्वस्थ वेदनेची धग




कवी स्नेही किशोर कवठे यांच्या 'अरण्यदीक्षा' कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे मानवी मूल्यांचा संवर्धक पाईक आहे.समतेचा जागर ही कवीच्या चिंतन सृष्टीची निर्मिती आहे.कवी आपल्या सृजनशील मनोज्ञ भावनेतून संयतवेदना व्यक्त करतो.ही एक भूमिजनांच्या संचिताची अस्वस्थ वेदना आहे.बाल कोवळ्या मनात अक्षर पेरणीकरावी त्यांच्या हातात पुस्तके दिसावी.ती लिहिती व्हावी.म्हणून ही कवी मनाची अद्म्य इच्छा आणि त्यासाठी आश्रमशाळेत शिक्षक एक सर्जनशील कवी म्हणून या डोंगरदऱ्यात अनवानी पायानी झाडा झुडपात वस्ती करून राहणारी मानव जी या मायभूमीची लेकरे आहेत.त्यांना माणुस म्हणून जगता आले पाहिजे. म्हणून अरण्यदीक्षा.ही सोसल्या भोगल्याची अस्वस्थता हा या कवितेच्या परिप्रेक्षाचा कनवाळू कैवार आहे.हे जल जंगल जमीन हे तर निर्मिक संपत्ती पण आदिवासींच्या संत्ततीची हेळसांड कायमचं.ही मुलं मुली या समकालीनतंत्रज्ञानाच्या बुलडोझरी युगाची शिकार झाले आहेत.आदिवांसीच्या साधनं संपत्तीची इथल्या राजकीय वर्तमानानी कंपन्या टाकून शिकार केली आहे. कवीने या अरण्यदीक्षांचा अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक धारदार निर्धारक उद्बबोध केला आहे.दु:ख दारिद्रय व अज्ञान या समकालीनात या राजकीय सामाजिक व्यवस्थेने घालवले तर नाहीच.तर त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांना फक्त आश्वासनाचा कोरभर तुकडा दिला जातो उपकार म्हणून!.हे या अरण्यदीक्षा चे रुदण ही कविता सखेद व्यक्त करते.कवीला निसर्ग व मानवीमुल्यांचे निस्सीम प्रेम आहे.कारण हा आदिवासींची जगण्याची कुत्तरओढ अजूनही चालू आहे.संघर्षाची भाष्या केलीतर त्यांच्यावरचं कायदाचा बडगा उगारला जातो."सातबारावरील नोंद पुसून"या चिंतन आशयात. 'पेरणरेघ, माणसं महानगरात आली शरीरानं,ही शहरी रस्ते ,पुर ओसरुन गेल्यावर,"दरम्यान,तरुणांची अबोल पावलं/कायम शहराकडं वळाली/मागे राहिल्या रिकाम्या वेशी,/आणि जमिनीच्या सातबारावरची/नोंद पुसली गेलेली/डोळ्यातल्या धुसर स्वप्नासह../हे अरण्यदीक्षाचं विदारक सत्य तर आहेच पण आपल्या भूकेच्या हिंसक वृत्तीला अहिंसतेने/समजून घेत/अलगद हसला गालातल्या गालात/बुद्धासारखा! (पृ.११) हे बेघरलेपण आदिवासींची चिंता कायमची झाली आहे.आज तो विराण होऊन तथागत बुद्धासारखा वाटतो आहे.या अथांग जल जंगल जमीनीचा मुळनिवाशी भूकेसाठी अजूनही व्यथित आहे.या समकालीन वास्तवात या तरुणांची अबोल पावलं शहराकडे वळाली आहे.गाववेशी भकास झाल्या.त्यांच्या डोळ्यातली स्वप्न धुसर झाली.ही माणसं शहरात आली शरीरानं.स्त्री,माय,माऊल्या या महानगरात धुणेभांडी करता आहेत.मुलं गॅरेज मध्ये. रस्त्यावर मेहनीतचा मांडव,यातही पोलिसांची जाचक नजर,पण गावाशिवार माय मातीचं एक संवेदनचं घर त्यांच्या काळजात आहे.हे शहरातले रस्ते,हे कवीच्या मनाचे संकल्पचित्र,तर पूर ओसरून गेल्यावर ही जगण्याची भग्नतेची किंकाळी

उरते,बैल,गोठा,दावण,खुंटा,कासरे,वेसण, घुंगरं कविता स्वप्नवत राहीली आहे.मुलं गहिवरून येतात बैलाशी त्यांच नातं घट्ट आहे.बापाचं नाळ नात्यांची गाठ कायम आहे बाप बापाचं असतो."मुलगा म्हणाला,/'बाबा बरं झालं,लावलं कंपनीतगेलं/स्पर्धा परीक्षेच्या घोडदौडीत मला गाठता येईल पुणं'/सोबत स्पोर्ट बाईक आणि आयफोनवरचं गाणं/पण विठ्ठल काहीच बोलला नाही" (पृ.२३)ही भूमीजनांची आर्तवेदना उघड्या डोळ्यांनी पाहावी लागते आहे.मुलं सारीचं शहरात उधळली आणि वावराची धुळधाण झाली.मनाच्या समाधानसाठी महापुरुषांची बिरूदे लावून फायदा नाही.बळीराजाचा अनाहुतपणे बळी जातो आहे.ही अस्वस्थ वेदनीची कविता.कवीने मनाचा खोल तळ ढवळून काढला आहे.शाळेतील आदिवासींची मुलं व त्यांचे जगण्याचे काटेरी बंबाळ भावविश्व मनाला रक्ताळून टाकते.ही कविता मन विव्हळून टाकते.आजतगात आदिवासी मुलांचे जगण्याचे चिंतन चित्रण त्यांचे मनोबल दृढ करणारी ही कविता आहे.कवी किशोर कवठे सर यांच्या सृजन समर्पक जगण्याचा शिक्षक म्हणून 'वर्ग हाच कवीचा स्वर्ग'मानणारे.मग ही "आदिम अक्षरलिपीच्या आता बाहेर"याभागात माझा विद्यार्थी घडला पाहिजे "मी त्यांना व्यवहाराचे जग शिकवत होतो/ते मला शाश्वत जगाची ओळख सांगत होते/खरंतर/मुलं अजूनही निसर्गात होती/आणि/मी निसर्गाच्या बाहेर कधीचाच फेकला गेलो होतो/नदीबाहेर फेकल्या गेलेल्या ओंडक्यासारखा"(पृ.२७)या समसृष्टीच्या आदिम अक्षरलिपीच्या आता बाहेरचा माणूसम्हणजे येणाऱ्या पिढीचा आदिवासींचा विद्यार्थी हा प्रचंड उद्विग्न होऊन जागतो आहे.'गुड टच बॅड टच, सेल्फी विथ सक्सेस,हे अत्यंत भंयकर वास्तवाची प्रखर जाणीव करून देणारी कविता आहे.शिक्षण आहे तितकाच समज गैरसमज नैतिक अनैतिक कृत्याचा पश्चात्ताप, व्यवस्थेचा चाकू,बळीचा बकरा,मुलींच्या न्हाणीधुती होण्याचा डाग,औद्योगिक क्रांती झाली पण या आदिवासी पर्यंत आलीच नाही.या औद्योगिक क्रांतीच्या पानावरच भात चिकटला होता अजूनही भूक कायमचं आहे.जणू ही मेंढीशाळा आहे रक्षण कशाचे करावे?"मेंढ्याचं?शिक्षणाचं?की डोंरभिंतीचं?/ आदिम दु:ख उराशी बाळगून एकटाच उभा/मात्र मेंढ्या चालत आहेत मागोमाग/परंपरा,भीतीआणि आदेशाच्या वाटेने/(पृ.३६)मन पिळवटून निघते. बोरं,खिरण्या,टेंभरं विकणारी झारूबाई.आश्रमशाळेतला झारुबाईचा मुलगा शिकून मास्तर झाला.पण तिचा जगण्याचा संघर्ष कायमचं.ती विकते उकळलेली बोरं अजूनही शाळेसमोर.तिचं सतर्क उत्तर अत्यंत सखेद आहे."गेटच्या आत जाणाऱ्या पालकांना/सतर्क करत म्हणते,/'कासरे आवळून ठेवा सैल करू नका दोर/ही रानपाखरंम्हंजे नुसता मायेले घोर',(पृ.३७)हे इथलं वास्तव वाचल्यावर कवीची आत्मानुभूती अत्यंत चिंतनीय आहे.नक्षलग्रस्त, संचारबंदी,कोणं मेलं कोणं जिवंत यांची नोंद. सरकारी दप्तराकरीता.ध्वनिशुन्य कान,गांधीजीची माकडं हे भयग्रस्त जगणं कवीने मांडले आहे.तर,आमचा राजा बिरसा मुडा,अरण्यवीर,अनंत अंधारात वाट काढणारे, व्यवहाराचे जग शिकविणारे शिक्षक,तर ते शाश्वत जगाची ओळख सांगणारे विद्यार्थी,टिलमली(गाईच्या कातड्याची टमकी,खंजीरी) 'नाही सर! काळजात जपून ठेवीन मी टिलमली'अतिशय मन व्याकूळ करणारी कविता.मलकू-सर्व देवाधर्माच्या कागदी प्रतिमा पण शिक्षणापासून कोसो दूर.भूकेशी लढताना गुन्हेगार ठरवणारी ही व्यवस्था या आदिवासींनाच 'अर्बन नक्षलवादी'ठरवते.आश्रमशाळेतीलनेहा,व डील वेडसर,आई धुणीभांडी, दहावी नापास,पुढे ती'हरियाणाला दिली' पैसाठी.ही विदारकता या कवितेने दिली आहे..'समकालाच विच्छिन्न चेहरा' ही आदिवासी रानपाखरं यांची पाठराखण करणारे कुणी नाही यांच्या अज्ञानी,आडाणी पणाचा असाह्यतेचा गैरफायदा घेणारे ही व्यवस्था."हे खरे आहे/दगडाचे सिंमेंट होणे टाळता येणार नाही/जगस्पर्धेच्या हव्यासापोटी/आणि/इमारतीत आदिम अंश असूनही/म्हणता येणार नाही ऐतिहासिक शिल्प"(पृ.६४)हे वास्तव काळेकिभिन्नआहे.दगाननंर,हुसेन घरी परतलाच नाही.तो झुंडीचा बळी.पक्षी झालेत मुजोर,ते गप्प गुमान चोंचीत चोच घालून कोरत बसतात.दगान होणाऱ्या मातीचे पोट, भूस्खलन,हक्काचा सातबारा गेल्यावर,अनुंपा, स्फोट,पाखरांचे आवाज मुके झाले तिथे आज यंत्राची गर्दी झाली.ऐतिहासिक शिल्प दिसतं नाही,ही माणसांची रांग अदृश्य दुकाना समोर हे जणू परंपरेचे बाळकडू,हे वर्तमान कायमचं तापलेलं,गावभूजा,खांदे, एकात्म सूर दिसतं नाही,या धुळीने ताबा घेतलाय मनावर,ही अजूनही समृद्ध प्रवाहाच्या शोधात आहे,नदी आहे पण जीव गेलेली, खरंच झाडं मरत नाही तर ही समृद्ध परिसंस्था नष्ट होते.हे झाडाचं कापलेपण मन पिळवटून जातं.या आश्रमशाळेच्या निमित्ताने कवीचा मनोज्ञ मर्मग्राही ज्ञानसाधनेचा भाग म्हणून ही भयमुक्त कविता.अगीकोर, अस्ताला चालेल्या कवितेसाठी, अमानुषतेचा विहित नमुना,सृजनत्व, कुणासाठी ठेवू?/पापण्यांना जागे/अंधाराला भोगे,/चांदरात (पृ.८८)हे जगणं भोगणं अतिशय सखेद कवीने मांडले आहे.'उजेडाचा चतकोर' या रानं पाखरांचे दैन्य दारिद्रय अजूनही संपलेले नाही.या प्रजासत्ताक स्वातंत्र्यात ही अरण्यदीक्षा कारण त्यांने घेतलीच नाही/अरण्यदीक्षा निसर्गाकडून/म्हणून साधता आला नाही/एकसूर/जगण्याच्या सर्वत्र विणलेल्या/लयतत्वांचा (पृ.९२) हे अद्वैत आदिम डोहातल्या खोलाचं रूदण आहे.'खोली' ही दु:खाची आदिम खोली आहे.प्रकाशाचा दिवा, आशावादाला धरुन आहे.हमीभावाचा आशावादी दिवस,उद्याचे वर्तमान शाबूत राहावे म्हणून..हे मनाचे मळभ दुर सारून हे तहान भूकेचे प्रश्न कायमच आहे.ही कविता संयत मनोभूमिकेतून मन व्यक्त करते त्यांच्या आयुष्याचा सूर धारदार निर्धाराचा व्हावा.माणूस म्हणून हा स्नेहबंध आहे.हा धामधुमीचा लख्ख हंगाम आहे.माणसं टाळणं जमतं नाही कारणं सत् विवेकी पालकत्व कवीत आहे.निष्पर्ण /साहेब,ज्यांना जात-धर्म-वंश-भाषा,/स्त्री-पुरूष शिकवू नका/त्यांना एक अख्ख झाड शिकवा"(पृ.१०५) ही दयेची कारुण्य भावना आहे.आताशा हे कुटुंब बोन्साय झालंय.हा ही दिवस कालच्यासारखा निघून जाईल, अभंग मनातून आलेली ही निष्ठावंत कवीची कविता आहे.'मनातला मोर जळून खाक झालाय'मन चिमणी होऊन आकाशी झेप घेईल.मेंदीचा रंग लाल नसेल हे अतिशय चिंतन आशय आहे.'मी वादळासारखा' पाऊस आला की बाईची प्रचंड धावपळ,झाडू पायदान,भांडे कपडे या भौतिक वस्तूत जीव.म्हणून "खरंच गं बाई तू निसर्गासारखी/आणि मी वादळासारखा"(पृ.११२) हे मनस्वी हृदयांकित सृजन.कवी प्रशांत असनारे लिहितात" या कवितेतील प्रश्न थेट आहेत.बोचरे आहेत;मात्र ते निराशेच्या गर्तेत ढकलणारे नसून सजग विचारांकडे नेणारे आहेत.कवीची संवेदनशील, मानवी आणि सकारात्मक दृष्टी हीच या संग्रहाची खरी ताकद आहे.त्यामुळे'अरण्यदीक्षा'हा केवळ समस्या दर्शन घडवणारा कवितासंग्रह न राहता परिवर्तनाचा आग्रह धरणारा सर्जनशील आणि वैचारिक संवाद झाला आहे (पोटराखण) कवीचे वास्तवदर्शी चिंतन असे "आदिवासी बहुल भागातील औद्योगिकरण,खाणी-सिमेंट उद्योगामुळे होणारी निसर्गाची व गावांची होरपळ,या साऱ्यांचे विदारक वास्तव 'अरण्यदीक्षा' या काव्यसंग्रहात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.सत्याला प्रतिमा-प्रतिकांची सजावट नसते;त्या असतात शुद्ध संवेदना.काळ बदलत राहतो, संदर्भ बदलतात.परंतू वेदनेची धग कायमचं असते.(मनोगत)ख्यातनाम कवी श्रीकांत देशमुख लिहितात "कवी किशोर कवठे 'अरण्यदिक्षा' हा कवितासंग्रह वर्तमानाचा शोकात्म दस्तऐवज आहे.माणूस आणि निसर्गाच्या आदिम तत्वाला सोबत घेऊन कवीने वर्तमानाला प्रदिर्घ हाक कवीने दिली आहे.एका शाश्वत मुल्यांची मागणी करणारी ही कविता हा एका परीने सांस्कृतिक ठेवा आहे.या सामुहिक जबाबदारीचे भान या निमित्ताने वाचकांना आले तर साहित्याचे सांस्कृतिक योगदान गवसले असे मानावे लागेल (ब्लर्ब) हे अतिशय चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक मत आहेच.पण ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल वर्तमानची सखेद खंत व्यक्त करते.मुखपृष्ठ संतोष घोंगडे यांचे आहे.स्तंभ पब्लिकेशन हाऊसचे अतिशय देखणी पुस्तक बांधणी आहे.मनस्वी शुभेच्छा.

**पुस्तक:-अरण्यदीक्षा (कवितासंग्रह),कवी:-किशोर कवठे, प्रकाशक:-अविनाश पोईनकर,स्तंभ पब्लिकेशन चंद्रपूर. मुखपृष्ठ:-संतोष धोंगडे, प्रथमावृती:-२६ जानेवारी २०२६, पृष्ठ संख्या:-११२किंमत:-२५०रूपये पुस्तक परिचय परिक्षण:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ ऑक्टोबर २०२६

# गिरीशच्या अध्यात्मिकताप्रचूर गझला

छ. संभाजीनगर येथे अक्षर अक्षर तुझेच आहे या कार्यक्रमात कवी गिरीश जोशी यांनी त्यांचा 'मी दिवा विझवला नाही' हा गझल संग्रह दिला. मुखपत्र आणि शीर्षक पाहून मला प्र. के. अत्र्यांची आठवण झाली. हा संग्रह मी प्रवासातच वाचून खुणा करून ठेवल्या. गिरीश जोशी हा अनेकविध विषय हाताळणारा तसेच विविध शैलीने कविता-गझल लिहिणारा कवी आहे. प्रमोद खराडे यांनी या संग्रहाला छान प्रस्तावना लिहिली आहे. गझल नवाज भीमराव पांचाळे यांनी मलपृष्ठावर संक्षिप्त परिच्छेद लिहून गिरीश जोशींची पाठराखण केली आहे. त्यामुळे वाचनीय अशा या गझल संग्रहाला अधिक वजन आणि देखणेपणही आले. अर्थात या गोष्टी रूढ आहेत पण जोशींनी त्या मोठ्या पारखून घेतल्या आहेत. आवश्यक असलेले 'आशयमोल' त्यांनी आपल्या अनेक द्विपदींमधून सादर केले आहे. या जगात सर्वांना येणारे बहूतेक अनुभव सारखेच असतात. जसे की मानवी स्वभावातून, नैसर्गिक सौंदर्यातून, समकालीन राजकीय आणि सामाजिक घडामोडीतून.... हे अनुभव ठळक जाणीवांनी येऊन आदळतात. त्यांना आपण 'लाऊड' म्हणतो. ते कोणत्यातरी प्रकारातून व्यक्त करण्यासाठी आपणास अस्वस्थ करतात. पण अनेकदा काही अनुभव किंवा कल्पना एवढ्या सूक्ष्म असतात की ते कवितेत टाकता टाकता कापुरासारखे उडून जाऊ शकतात. पण त्यांची अशी वाफ होण्याच्या आत वटिका बनवून रसिकांपर्यंत पोचवण्यासाठी एक शिताफी, एक हातोटी लागते. कदाचित हे प्रत्यक्ष उदाहरणावरून अधिक स्पष्ट कळेल. जसे की एखादे सत्य जर व्यापक समूहाला दु:खी करणारे ठरू शकत असेल तर ते सत्य संवेदनशील व्यक्ती प्रकट न करता आपल्याच मना-मेंदूतील खुंटीला अडकवून ठेवतो. हा अनुभव खरे तर अत्यंत विरळ असून कोवळा, किवलासा आहे. पण गिरीश जोशींनी तो पकडला आणि विश्वास ठेवून त्याला शब्दांचे अवगुंठन देऊन द्विपदी लिहिली. "ढासळणे पाहू शकलो नसतो कुठल्याच घराचे मी म्हणून जाणाऱ्याचा संदेश कळवला नाही" दुसरी ओळ स्पष्ट काहीच सांगत नाही की कुणी प्रिय व्यक्ती गाव सोडून गेली की स्वर्गवासी... इथे रसिकाने कोणता अर्थ घ्यायचा, तो घेऊ शकतो. ते स्वातंत्र्य कवीने वाचक-श्रोत्यांना दिले. कदाचित वरील द्विपदी चर्चेत घेतल्यासंबंधी कवीला आश्चर्य होऊ शकेल की हा शेर आस्वादासाठी यांनी (मी) का घ्यावा? तो मी यासाठी घेतला की मला नेमका याच्या एकशेऐंशी कोणाच्या विरुद्ध अनुभव आला होता, बघा- "मी किती झाकत होतो मरणाची वार्ता पण तसे दु:ख न पुत्रास मृताच्या व्हावे" एखाद्या परगावी राहणाऱ्या मुलापासून किंवा मुलीपासून त्यांच्या आईच्या किंवा बापाच्या मृत्यूची वार्ता आपण त्याला घरी पोहोचेपर्यंत झाकून ठेवावी की त्याच्यावर आघात झाल्यासारखे होऊ नये म्हणून! पण नंतर दिसून येते की मुळात त्यांना त्या मृत्यूचे फार काही दु:ख झालेले नसते. हा विषय सूक्ष्म असून अनुभव विरळा आहे. मला जाणीव आहे की आपणास आस्वाद गिरीश जोशींच्या गझलचा घ्यायचा आहे त्यात मी माझे घोडे दामटत बसू नये. पण जोशींनी जो सूक्ष्म अनुभव कवितेचा विषय केला. तो अनुभव अन्यत्र कुठेच नसतांना आपण तो आपल्या अभिव्यक्तीचा विषय आधी केलेला असावा, हा योगायोग मला वाचकांना सांगायचा होता. त्याचा पुरावा म्हणून वर ती द्विपदी दिली.गिरीश जोशींच्या या संग्रहाला शीर्षक देणारी ही गझल आहे, ती स्वभावत: आदर्श प्रकृतीची पण सामान्य माणसाच्या वर्तनाची उदाहरणे देणारी गझल आहे. तीची प्रारंभिक द्विपदी म्हणजे मतला असा आहे - "मी केलेल्या कामाचा डंकाच पिटवला नाही मी साधे जीवन जगलो इतिहास घडवला नाही."मराठवाड्यात बहुतेक क्रियापदांना वेलांटी लावतात. जसे की - पुरणाच्या पोळ्या अशा लाटिल्या, चित्र काढिले, घास भरविला, निरोप धाडिला - पाठविला.... गिरीशने या गझलमधील काफियांना वेलांट्या का दिल्या नाहीत, हा एक प्रश्नच आहे. बघा- "ना सूर्य कुणाचा झालो ना पणती होऊ शकलो पण कुठल्याही घरट्याचा मी दिवा विझवला नाही."शब्द म्हणाल तर जड पण त्यात चैतन्य ओतण्याचे कौशल्य कवी सिद्ध करतो. गाडी म्हणताच दोस्त या हिंदी चित्रपटातील- "गाडी बुला रही है...." या गाण्याची आठवण होते. आणि मग गाडी कशी माणसापेक्षा शहाणी आहे, तिच्यापासून माणसाने काय काय शिकण्यासारखे आहे...वगैरे त्यात आहे. गिरिशची गाडी कशी नको तेंव्हा वेळ पाळते, आणि याला नेमका तेंव्हाच उशीर होतो. लवकरच भेटू सांगते पण गाडी तिकडे फिरकतच नाही, मुंबईतील गाड्यांवर गाड्या... "वेळेस पाळण्याचे शिकली कुठून गाडी? थोडा उशीर झाला गेली निघून गाडी भेटूच यार लवकर इतकेच ती म्हणाली पण आज वर इथे ना आली वळून गाडी आजन्म प्रश्न छळ तो असतो तरी निरुत्तर जाते कुण्या घरी ती येते कुठून गाडी." 'गाडी' प्रमाणेच गिरीशने 'आजी' या 'अंत्य' यमकाचे सोने केले. "संस्काराची ओंजळ होती आजी मांगल्याचा दरवळ होती आजी तिची पोकळी कशी भरावी कोणी माझे नभ अन् भूतळ होती आजी एकविसाव्या शतकामधे, क्रिकेट खेळीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना 'इम्पॅक्ट प्लेअर्स' असे एक संबोधन प्रचलित झाले. ही या काळातील एक नवीन संकल्पनाच म्हणा ना! तसेच काही शेर गझलमध्ये असतात. तसे काही शब्द एका ओळीत असतात. ते आशयात नेमका तसा प्रभाव निर्माण करतात. आशयाला उंची देतात उदा, - वर वर दिसते तितकी कोठे डोळस आहे? दुनिया म्हणजे अंधाराचे पाडस आहे. दुसऱ्या ओळीत 'पाडस' या शब्दाने जगाच्या आंधळेपणावर कवी चीड व्यक्त करीत नाही, तर त्याला दुनियेविषयी करुणा आहे. हा शेर संत साहित्याशी नाते सांगणारा शेर आहे. त्यात जगाविषयी कणव व्यक्त झाली. अध्यात्मिकता हा गिरीश जोशीचा स्थायी भाव असावा. या शेरातील संपूर्ण प्रभाव निर्मितीचे श्रेय जाते 'पाडस' शब्दाला. ही अशी शब्दांची नेमकी निवड गझलेतील प्रमुख शस्त्र आणि सरळ शास्त्र आहे. पुढे कवी म्हणतो - "काही इच्छांचा तर आहे पिता खरा मी काही इच्छांचा जत्था बेवारस आहे." आपल्या सभोवती असे एकेक गारूड असते की आपण आपली मूळ प्रकृती जपू शकत नाही. नकळतपणे आपण भोवतीच्या रंगात आत्मविस्मृत होत जातो. तरुण मुले, विशेषत: मुली म्हणतात आम्ही आमच्या आवडीची वस्त्रे वापरु! कुणी आमच्या आवडी निवडीवर बंधने लादू नये. आमचे आम्हाला काही स्वातंत्र्य नाही काय? पण खरे तर पंधरा ते वीस वर्ष वयाच्या मुला-मुलींवर हिंदी चित्रपट सृष्टीने गारूड करून त्यांचा मानसिक बौद्धिक ताबा घेतलेला असतो. आणि मग त्या प्रभावाखाली राहून ते असे समजतात की ती आवड त्यांचीच आहे. हे इथेच थांबत नाही. लग्नानंतर पुरुषांना वाटते आपण आपल्या डोक्याने निर्णय घेतो. पण तसे नसते, त्याच्या डोक्याचा ताबा स्त्री घेते आणि त्याप्रमाणे तो आई-बापाशी इतका अनुचित वर्तन करतो की सर्वांना आश्चर्य वाटते. तो जागृत झाला तर वरील शेर कळतो. माणूस मूळ स्वरुपात तालबद्ध असतो. पण हा भोवताल त्याला बेताल करतो. फारसे प्रसिद्ध नसलेले, अल्पशिक्षित पण भाषा, शब्दांचा वापर आणि व्याकरण तसेच काव्याची उत्तम जाण असलेले उर्दू शायर सैय्यद सुबहान 'अंजुम' यांचा शेर इथे नोंदवण्याचा मोह होतो. "लोग बादल की तरह राह मे आये वरना मै तो सूरज की तरह घर से बराबर निकला" आपली एकूण ओढ, विचार, आवडी, काही असतात. पण नंतर लोकांच्या प्रभावात आपण काहीतरीच होऊन जातो. हा शेर कुणीही नीटपणे वाचला, सांगितला तर फार मोठे काम होते. थोडी पुनरावृत्ती होईल पण आवश्यक म्हणून लक्ष द्या. हिंदी चित्रपट सृष्टीतील आंबट शौकीन लोकांच्या सापळ्यात अडकून मुली बोलतात. तशी त्यांनी ही वस्त्रे वापरली नसती. हे चित्रपटांच्या मागे बसलेल्या बदमाश पुरुषी कपट आहे. त्यांना माहीत आहे की समाजातील जो अक्कलशून्य भाग आहे, तो हिंदी चित्रपट सृष्टीतील अर्धनग्न फॅशनचे अनुकरण करतो. त्यातील मुली आपणास महाविद्यालयात, बाजारात, गरबा महोत्सवात, मंदिरात, चित्रपट गृहात आणायच्या आहेत. आई-बाप यासंबंधी सावध असतात, ते हे मुलांना मुलींना सांगतात. त्यातील काही ऐकतात. काही बाधित मेंदूची श्वापदे ऐकत नाहीत. पण त्यांना वाटते ती वस्त्रे 'आपण' निवडतो. खरे म्हणजे त्या वस्त्रांचा तुमच्यावर संमोहन करून तुम्हाला घेण्यास भाग पाडले आहे. ज्या समाजाला बाजार घडवतो तो समाज रसातळाला जातो आणि जो समाज सावधपणे आपल्या हिताचे काय आहे याचा विचार करून बाजाराला आकार देतो, तो समाज जगाचा बाजार आपल्या मुठीत घेतो. यावर मी उलट दिशेने चिंतन केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर, गांधीजी.... यांनी कुणाच्या प्रभावात जाऊन किंवा परिस्थितीला शरण जाऊन भलत्या इच्छा-आवडीच्या टोळ्यांना आश्रय दिला नाही. त्यासंबंधी शेर बघा: "ढगांपरी आडवे जरी हे अनेक रस्त्यात लोक आले चढे नभी सूर्य त्याप्रमाणे अचूक त्यांचा प्रवास होता" गिरीशचा संपूर्ण संग्रह इथे उपसून वाळत घालण्याची आवश्यकता नाही. त्याचा एक शेर जरी समाजाला ढवळून काढण्यासाठी कारण ठरत असेल आणि तसे आशय त्यातून उकलून काढता येत असतील तर ते खरे कवीचे काम आहे, ती कवितेची उपलब्धी आहे. पण संग्रहातील कोणत्याही दहा गझल घेतल्या तर त्यातील निदान सहा गझल अशा असाव्यात की सामान्य वाचकाला त्या वाचतांना थांबण्याची आवश्यकता पडावी आणि कोणत्याही गझलमध्ये निदान तीन चार शेरांच्या आशयाने त्याला आंदोलीत केल्याचा अनुभव व्हावा. अशी एक सर्वसाधारण कसोटी कवीने आपल्या गझल संग्रहाला लावली पाहिज. कलेला कुठे अशी कसोटी लागते काय? ही अमूर्त शैलीची सवलत (इथे भट असते तर त्यांनी लबाडी शब्द वापरला असता.) चालत नाही. इथे मूर्त आविष्कार ही पाहिली अट आहे. आणि मूर्त आविष्कार करतांना कवीचे फसणे चटकन कळते. अमूर्त शैलीत एक ब्रश इकडे टेकवला काय आणि एक फराटा तिकडे मारला काय चालून जाते. तिथे आपापले अर्थ काढण्याची सवलत असते. एवढेच नव्हे तर कोणत्याही निर्मितीचा अर्थ काढण्याचा अट्टाहास कशासाठी? असे प्रश्न विचारून ते लोक अंगावर बेडूक फेकून कुणाला दचकवून टाकावे तसे अर्थ समजण्याची तहान असलेल्या रसिकांना चूप करू शकतात. पण पोस्टर आर्टसाठी कॅनव्हास घेतल्यावर किंवा कोणत्याही रियल आर्ट साठी ब्रश किंवा पेन हाती घेतला की लबाडी चालत नाही. तसेच गझलमध्ये एकतर शेर सपाट होतात, क्लिष्ट होतात नाही तर त्यामधील आशय मूल्य हरवलेले दिसते. इथे गूढ, अमूर्त अशा पडद्याच्या आड काही लपवता येत नाही किंवा खूप खोल काही आहे असा ढोंगाचा पसारा असल्याचा आभासही करता येत नाही. कवी प्रामाणिक असला तर तो चक्क आपण वापरत असलेला शब्द शब्द कोशांत बघतो आणि त्याचा अर्थ आपल्या ओळीतील आशयाशी सुसंगत नसला तर किंवा त्यातील उकार, वेलांटी ऱ्हस्व असतांना आपणास दीर्घ असणे आवश्यक असला तर घेत नाही. गझल सुगरणीचा खोपा किंवा पत्रावळ आहे. जिथे जे पान हवे तिथे तेच पान लावावे लागते. मधे कुठेही जरासे बेढब पान लावाल तर ती ओळ अजागळ दिसते. विशेषत: पहिल्या संग्रहात हे होण्याच्या शक्यता अधिक असतात. म्हणून पहिले संग्रह काढतांना निदान चार दोन लोकांना दाखवून त्यांच्या अनुभवाचा लाभ घ्यावा. त्यामुळे आपण अजागळ ओळी (मिसरे) आणि भरतीचे शेर यांच्या संख्येपासून वाचतो. मला एका ठिकाणी 'दत्तोपंत' जोगांनी कसे पकडले बघा -(या निमित्ताने 'धडा' म्हणून असे उदाहरण देणे श्रेयस्कर ठरावे.) "घडी जो वर्तमानाची सजगतेने धरुन राहिल जसा आता तरुण आहे हमेशा तो तरुण राहिल" वरील ओळींमध्ये माझ्याकडून 'राहिन' लिहिले गेले होते. त्यांनी मला ते सुधारण्याचीसूचना केली. प्रमाण मराठी भाषेतील ह्या चोखंदळपणाचा लोक तिटकारा करतात. पण मी त्याचे स्वागत करतो. दत्तप्रसाद जोग, धन्यवाद! अशी काही स्थळे गिरीशला एकतर गझलसंख्या कमी करून किंवा जुजबी चर्चा-चौकशीतून टाळता आली असती. पण तसे कुणी भेटणे हाही एक योगायोग असतो. गिरीशला पुढे असे अधिकाराने सांगणारे लोक मिळोत, अशा सार्थ शुभेच्छा देतो. कारण त्याची आपणाला नितांत आवश्यकता आहे! बघाना, अशा अपेक्षा किंवा संकेत प्रत्यक्ष जगद्गुरू तुकोबारायांनी स्वत: साठी व्यक्त केल्या आहेत. "माझिया जातींचे, मज भेटो कोणी ।  आवडीची धणी फेडावया ॥ (धणी = कुतूहल, छंद, हौस)गिरीशमुळे तेवढे वाचन, संवाद झाला, 'अंजुम', तुकारामांची आठवण झाली. संदर्भाच्या आवश्यकतेतून माझेही शेर सांगण्याची संधी मिळाली. धन्यवाद!

**शिवाजी जवरे,**
**बुलडाणा,**
8076095312